# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/08/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

### चोरी

**१) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत प्लांट डी ईरा टी ॲन्ड डी लिमीटेड एमआयडीसी उमरेड येथे दिनांक २६/०७/२०२३ चे ०२.२० वा. ते दिनांक २८/०७/२०२३ चे ००.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— शिवशंकर जनार्धन गंडाईत वय ३९ वर्ष, रा. प्रधानमंत्री आवास योजना ए व्हींग फ्लॅट क्र. २०४ दर्शन कॉलनी नंदनवन नागपुर ह. मु. मिलन चौक मंगळवारी उमरेड हे प्लांट डी ईरा टी ॲन्ड डी लिमीटेड एमआयडीसी उमरेड येथे खाजगी कंपनीत सिनीयर ऑफिसर या पदावर काम करीत असुन ते सकाळी कंपनीत कामावर आले असता १) कंपनीतील १२+१२ लांबी रूंदीचे ज्याची जाडी २० ते २५ मी. मी. २६ प्लेटा वजन ९७० कि. ग्रॅ. किंमती अंदाजे २०,३७०/— रूपयाचा मुद्देमाल ठेवलेल्या जागी दिसुन आला नाही २) रॉ. मटेरियल यार्ड मेंटेनन्स विभागाचे प्रफुल वाघमारे यांनी सांगितले की १५०+१५०+१२ मीमी ॲगल ३०+१३०+१२ मीमी ॲगल लांबी+रूंदी एल साईजचे एच टी ॲगल १९ नग वजन ६६४ कि.ग्रॅ. किंमती अंदाजे १३९४४/— रू. तसेच ३) मेंटेनन्स विभागाचे मॅनेजर कार्तिकी श्रीवास्तव यांनी सांगितले की, खराब झालेले क्रेन व्हील ज्याला रिपेअर करून ठेवलेले ०६ नग व्हील ज्याचे वजन ३२० कि.ग्रॅ. किंमती अंदाजे ६७२०/—रू. असा एकुण ४१०३४/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार प्रकाश आलाम मो. नं. ९७६७५४५४३८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत १२ किमी अंतरावर मौजा डूमरी शिवार येथे दिनांक ०६/०८/२०२३ चे २०/०० वा. ते दि. ८/०८/२०२३ चे २१/०० वा. पर्यंत फिर्यादी नामे— रमेशकुमार नरेंद्र चौव्हान, वय ३२ वर्ष, रा. कोसमी तह. बरघाट सिवनी म्हालगी नगर अंकित माटे नेहरू नगर नागपुर हा ठेकेदार असुन नागपुर जबलपुर रोडवर फिर्यादी व फिर्यादीचा मित्र हे दोघे मिळुन नविन पेट्रोल पंपचे काम करत असुन त्या पेट्रोलचे कामाकरीता लागणारे पाईप १० फुट चे ८० लोखंडी जेक पाईप प्रति नग अंदाजे किंमती ५००/— रू १० फुटचे ०९ लोखंडी स्पेन प्रती नग अंदाजे ५००/— रू असे एकूण किंमती अंदाजे ४४५००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रामटेके ब. नं. २९८ मो. क्र. ८४८५८६१४४२ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. खापरखेडा –** दिनांक ०८/०८/२०२३ चे १६.०० वा. चे सुमारास पो.स्टे. खापरखेडा हद्यीत फिर्यादीची मुलगी वय १७ वर्ष हि घराच्या बाहेर झुला झुलत असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव पोस्टे खापरखेडा मो. नं. ९९२३१०४३१० हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०८ किमी अंतरावर मौजा उबगी, ता. कळमेश्वर येथे दिनांक २०/०६/२०२३ चे १०.०० वा. ते दिनांक ०४/०७/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान फिर्यादी याचे मोबाईलवर अज्ञात आरोपीने मोबाईलने फोन करून तुमचे क्रेडीट कार्डची तारीख संपलेली असुन बंद झाले आहे. पुन्हा सुरू करण्यासाठी मी सांगीतलेल्या मोबाईल क्रमांकावर ओ टि पी पाठवा असे सांगीतले वरून फिर्यादिने ओटीपी पाठविला असता फिर्यादीचे अकाउंटमधून क्रमाक्रमाने पैसे अज्ञात आरोपीचे अकाउंटमध्ये जाऊन फिर्यादिचे एकुण ७४७७५/– रु विड्रॉल होऊन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादवि. सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास कळमेश्वर पोलीस करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**